शनैश्वर देवस्थानविरुद्धच्या तक्रारीवर आठ आठवड्यांत निर्णय घ्या

उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला आदेश दिल्याचा दावा

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : शनिशिंगणापूर येथील श्री शनैश्वर देवस्थानमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारीवर राज्य सरकारने आठ आठवड्यात निर्णय घ्यावा, असे आदेश उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. याचिकाकर्ते सचिन प्रभाकर दरंदले यांनी ही माहिती दिली. राज्य सरकारने निर्णय घेण्यापूर्वी याचिकाकर्ते दरंदले यांनाही बाजू मांडण्यासाठी संधी द्यावी, असेही न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी व न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला आहे. शनैश्वर देवस्थानमध्ये आर्थिक गैरव्यवहार, क्यूआर कोडच्या माध्यमातून अनियमितता, बनावट पावती पुस्तके, बनावट पूजा, कर्मचारी भरती, गेल्या दहा वर्षांमधील आर्थिक व्यवहारांची केंद्रीय तपास यंत्रणांमार्फत चौकशी, स्वतंत्र लेखापरीक्षण करण्याची मागणी सचिन दरंदले यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. मात्र, त्यावर निर्णय न झाल्याने दरंदले यांनी वकील उमाकांत वाघ यांच्यामार्फत उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. या याचिकेवर निकाल देताना उच्च न्यायालयाने राज्य शासनाला आठ आठवड्यात निर्णय घेण्याचा तसेच याचिकाकर्त्यांनी जमा केलेली पाच लाख रुपये व्याजासह परत करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही न झाल्यास पुन्हा उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल, असेही सचिन दरंदले यांनी सांगितले.

‘जी-राम-जी’ योजनेला प्रारंभ

‘मनरेगा’ची ४२ हजार कामे अपूर्ण

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : केंद्र सरकारने ग्रामीण भागासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) बंद करून विकसित भारत रोजगार व अजिविका हमी अभियान (जी-राम-जी) सुरू केली असली, तरी अहिल्यानगर जिल्ह्यात मनरेगाची ४१ हजार ८०८ कामे अपूर्ण राहिलेली आहेत. मनरेगातील एकूण ६० हजार २०८ कामे पूर्ण करण्यासाठी एप्रिलनंतर दोनदा मुदतवाढ देण्यात आली. मात्र या काळात केवळ १८ हजार ६०० कामे पूर्ण होऊ शकली.

> अकुशल काम करणाऱ्या प्रत्येक प्रौढ सदस्याला केंद्र सरकारकडून १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली आहे. अभियानांतर्गत ३१८ प्रकारची कामे मंजूर असून, मजुरीचा दर प्रति दिन ३१७ रुपये निश्चित करण्यात आला आहे.
>
> **– वर्षा पवार,** उपजिल्हाधिकारी

‘‘जी-राम-जी’’ योजना सुरू करताना आता मनरेगामध्ये अपूर्ण राहिलेली कामे नवीन योजनेत हस्तांतरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र योजना हस्तांतरण प्रक्रिये दरम्यान गेल्या चार दिवसांपासून सर्वच कामे बंद अवस्थेत आहेत. मजुरांच्या कामाचे मस्टरही बंद ठेवण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाकडून ही माहिती उपलब्ध झाली. मनरेगामधील प्रलंबित कामांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे - अहिल्यानगर २२०४, अकोले २३१२, जामखेड ६५७२, कर्जत ६१४५, कोपरगाव २१०२, नेवासे ३२५७, पारनेर २३८८, पाथर्डी ३६४६, राहता १९९०, राहुरी १५७३, संगमनेर ३००२, शेवगाव ३०३५, श्रीगोंदा २४००, श्रीरामपूर ११८२.

केंद्र सरकारच्या नवीन ‘जी-राम-जी’ योजनेची सुरुवात जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया यांच्या उपस्थितीत करण्यात आली. ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती, शाश्वत उपजीविका, नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन व सर्वांगीण विकासासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन त्यांनी या वेळी बोलताना केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी वर्षा पवार, जिल्हा कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे, विभागीय वन अधिकारी अमोल जाधव, उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक सुभाष सातपुते, रेशीम विकास अधिकारी संदीप आगवणे, जिल्हा समन्वयक विकास घिगे आदी उपस्थित होते.

पालिकेच्या करवाढीविरोधात श्रीरामपूर शहरात बंद

अहिल्यानगर : श्रीरामपूर शहरातील घरमालक, गाळेधारक, व्यापारी तसेच व्यावसायिक आस्थापनांवर घरपट्टी, नळपट्टी आणि दुकानांवरील करामध्ये दुप्पट ते पाचपट वाढ केल्याच्या निषेधार्थ रविवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. रिपब्लिकन पक्षाने पुकारलेल्या या बंदला श्रीरामपूरमधील व्यापारी, व्यावसायिक आणि विविध राजकीय पक्षांनी पाठिंबा दिल्याने बंदला चांगला प्रतिसाद मिळाला.

श्रीरामपूर नगरपरिषदेच्या वाढीव कर आकारणीमुळे घरमालक, लहान-मोठे व्यापारी आणि गाळेधारक आर्थिक संकटात सापडल्याचा आरोप आंदोलकांनी केला. नगरपरिषदेने नागरिकांशी चर्चा न करताच अन्यायकारक पद्धतीने करामध्ये मोठी वाढ केली असून हा निर्णय तत्काळ मागे घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

शहरातील प्रमुख मार्गांवरून आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांच्या नेतृत्वाखाली जनजागृती फेरी काढण्यात आली. त्यानंतर गांधी पुतळा परिसरात करवाढीच्या विरोधात ‘अन्यायकारक करवाढ रद्द करा’, ‘श्रीरामपूरकरांवरील आर्थिक जुलूम बंद करा’, ‘वाढीव करपट्टी मागे घ्या’ अशी घोषणाबाजी करण्यात आली. नगरपरिषदेने वाढविलेल्या करपट्टीच्या प्रतींची होळी केली. आंदोलकांनी नगरपरिषद प्रशासनाविरोधात रोष व्यक्त करत, करवाढीचा निर्णय त्वरित रद्द न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला.

या आंदोलनात व्यापारी संघटनेचे संचालक गौतम उपाध्ये, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष संतोष डहाळे, शहराध्यक्ष उमेश पवार, राष्ट्रीय जनसेवा पक्षाचे जिल्हाध्यक्ष तेजस गायकवाड, माजी नगरसेवक मुक्तार शहा, मोहम्मद पोपटिया, बाळासाहेब चांडवले, सतीश कुंकूलोळ, रमीज पोपटिया यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी सहभागी झाले होते. फेरी दरम्यान व्यापाऱ्यांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने बंद ठेवून पाठिंबा दिला. बहुतांश बाजारपेठा होत्या.

आंदोलनाच्या शेवटी सुभाष त्रिभुवन यांनी श्रीरामपूर शहरातील सर्व व्यापारी, व्यावसायिक, नागरिक तसेच विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, नागरिकांवर अन्याय करणारी ही करवाढ तातडीने मागे घेतली नाही तर आगामी काळात यापेक्षा अधिक तीव्र आंदोलन केले जाईल.

संत निवृत्तिनाथ पालखीचे स्वागत

संगमनेर : रिमझिम पाऊस धारांच्या साक्षीने, विठू नामाच्या गजरात श्रीसंत निवृत्तिनाथ महाराज पालखीचे आज, रविवारी जिल्ह्यात, संगमनेर तालुक्याच्या सीमेवर आगमन झाले. भक्तिमय वातावरणात माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी या पालखीचे स्वागत व पूजन केले.

पंढरपूरकडे निघालेल्या या पालखीचे संगमनेर तालुक्यातील पारेगाव बुद्रूक येथे हजारो वारकऱ्यांसमवेत आगमन झाले. माजी मंत्री थोरात, खासदार राजाभाऊ वाजे, डॉ. जयश्री थोरात, डॉ. हसमुख जैन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त पोलीस अधिकारी सोमनाथ वाकचौरे, पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, बी. आर. चकोर, अविनाश सोनवणे, हौशीराम सोनवणे, सुभाष सांगळे, संपतराव गोडगे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

त्र्यंबकेश्वरवरून निघालेल्या या दिंडीमध्ये सुमारे वीस हजार वारकरी सहभागी आहेत. वारकऱ्यांनी हरिनामाचा गजर करत, टाळ-मृदंगाच्या तालावर अभंग गात आज जिल्ह्यात प्रवेश केला. लेझीम पथक, पारंपरिक वाद्य, विद्यार्थ्यांनी केलेली पारंपरिक वेशभूषा, दिंडीच्या स्वागतासाठी उभारलेल्या कमानी यांसह गावकरी व सह्याद्री विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पालखीचे स्वागत केले.

यावेळी थोरात म्हणाले, महाराष्ट्रातील नागरिकांसाठी पंढरीची वारी ही आनंदवारी असते. शांतता, समानता, एकता आणि सद्भावना याचे प्रतीक असलेली पंढरीची वारी ही शांततेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. जगाच्या दृष्टीनेही या वारीचे मोठे महत्त्व आहे. त्यामुळेच परदेशातूनही अनेक भाविक, भक्तगण वारीच्या निमित्ताने पंढरपुरात येत असतात. माऊली या एका शब्दाने सर्वजण एकत्र बांधले जातात. खासदार वाजे यांनी यावर्षी सर्वत्र चांगला पाऊस पडून महाराष्ट्रातील जनता सुखी होऊ दे, अशी प्रार्थना त्यांनी केली.

वारकऱ्यांसाठी सुविधा

संत निवृत्तिनाथ महाराज पालखीतील वारकऱ्यांसाठी दरवर्षी अमृत उद्योग समूहाच्या वतीने विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. यंदाही वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर, एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टच्या वतीने डॉक्टरांचे पथक, चहा, नाश्ता, राहण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

परिशिष्ट - IV-अ - अचल मालमत्तांची ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालयः नववा मजला, अंतरिक्ष भवन, 22, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-110001 फोनः 011-23357171, 23357172, 23705414, वेबसाईटः www.pnbhousing.com

शाखा कार्यालय अहमदनगरः युनिट क्र. 203, दुसरा मजला, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, पंचशील हॉटेल जवळ, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र - 414003

याद्वारे खाली स्तंभ क्र.-अ मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ-ड मध्ये नमूद अचल मालमत्तेचा **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** (पीएनबी एचएफएल)/सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक/प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ-क मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **‘‘जशी आहे जेथे आहे’’ आणि ‘‘तेथे जे काही आहे’’** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार/गहाणदार/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार/गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनको **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

कर्ज क्र., कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (अ)	मागणी केलेली रक्कम आणि दिनांक (ब)	ताब्याचे स्वरूप (क)	तारण मालमत्तांचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (ई)	बयाणा रक्कम (आरक्षित किमतीच्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी रक्कम (एच)	पाहणी दिनांक आणि वेळ (आय)	लिलाव दिनांक आणि वेळ (जे)	ज्ञात बोजे/ न्यायालयीन खटले असल्यास (के)
HOU/AHMD/0722/1012470, अविनाश वसंतराव हंस / नागपुरे संदीप कृष्णकांत, शा.का.: अहमदनगर	रु. 31,57,177.77 आणि 08-08-2024	प्रत्यक्ष ताबा	स.क्र. 12/48/1ए2, प्लॉट क्र. 2, चैतन्य प्लाझा, अपार्टमेंट सदनिका क्र. 203, स्टील्ट पहिला मजला, गजरत फॅक्टरी जवळ, सावेडी, भिस्ताबाग, अहमदनगर, महाराष्ट्र - 414003, भारत.	रु. 24,33,000	रु. 2,43,300	21/07/2026	रु. 10,000	10-07-2026 रोजी दु. 12.00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	22-07-2026 रोजी दु. 2.00 ते दु. 3.00 वाजेपर्यंत	ज्ञात नाहीत

***सोबत भरण्याच्या व/वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ क्र.-के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल/अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे/दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने/बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार/बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. 1.** आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता/अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि त्याची स्थिती स्तंभ-के मध्ये नमूद करण्यात आली आहे. **2.** संभाव्य खरेदीदारांनी/बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ-के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया/आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथपर्यंतच मर्यादित नसून त्यांनी निविदा/बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदारास बोली प्रपत्रासोबत सदर लिलावाच्या अटी व शर्तींवर स्वाक्षरी करावी लागेल. **3.** कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार/खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल, अन्यथा मालमत्ता/अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. **4. प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरयाणा, 122003 येथे कॉर्पोरेट कार्यालय असलेल्या मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. वेबसाईटः www.bankeauctions.com मालमत्तेच्या पाहणीशी किंवा बोली दस्तावेज प्राप्त करण्याशी संबंधित कोणत्याही मदतीसाठी आणि कोणत्याही चौकशीसाठी किंवा नोंदणीसाठी आपण पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत अधिकारी श्री गणेश अंकुश / नीलाक्षी पाटील, टोल फ्री : 18001208800, ईमेलः auction.pnbhousing.com वर संपर्क साधावा, किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

स्थानः अहमदनगर दिनांकः 04.07.2026 — स्वा/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

भारतीय स्टेट बँक / State Bank of India — ताबा सूचना (अचल मालमत्ताकरिता)

क्षेत्रीय कार्यालय, अहमदनगर

तर, अधोस्वाक्षरी केलेले 'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' (SARFAESI कायदा) अन्वये आणि 'सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रूल्स, २००२' च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, स्टेट बँक ऑफ इंडियाचे अधिकृत अधिकारी (खाली सही करणारे) यांनी कर्जदार अक्षय भगवान घुले यांना २८/०४/२०२६ रोजी मागणी नोटीस बजावली होती. या नोटिशीद्वारे त्यांना, मागणी नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, करारातील दराप्रमाणे व्याजासह रु. ४१,९६,८२६.५४ /- (एक्केचाळीस लाख शहाण्णव हजार आठशे सव्वीस रुपये आणि चौपन्न पैसे) ही रक्कम परत करण्यास सांगण्यात आले होते. कर्जदारांनी सदर रक्कम परत करण्यात कसूर केल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचित करण्यात येते की, खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने उक्त कायद्याच्या कलम १३(४) आणि उक्त नियमांच्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ०७/०१/२०२५ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये; आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या रु. ४१,९६,८२६.५४ /- (एक्केचाळीस लाख शहाण्णव हजार आठशे सव्वीस रुपये आणि चौपन्न पैसे) अधिक गृहकर्जावरील न-लागू केलेले (unapplied) व्याज व इतर शुल्क आणि करारातील दराप्रमाणे व्याजाच्या बोज्या अधीन असेल.

अचल मालमत्तेचे वर्णन : प्लॉट क्र. १० ची पश्चिम बाजू, सर्व्हे क्र. ५९/१, प्लॉट क्र. १०, एचपी (HP) गॅस गोडाऊनच्या मागे, भूषण नगर, लिंक रोड, केडगाव, अहमदनगर ४१४००५.

या मालमत्तेच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत : पूर्वेकडे: प्लॉट क्र. १० (P), पश्चिमेकडे: प्लॉट क्र. ९, दक्षिणेकडे: सर्व्हे क्र. ५७ (P), उत्तरेकडे: रस्ता.

दि. ३०/०५/२०२६ (मराठी भाषांतर, मुळ इंग्रजी मसुदा ग्राह्य)
ठिकाण : अहिल्यानगर

प्राधिकृत अधिकारी
स्टेट बँक ऑफ इंडिया,
क्षेत्रीय कार्यालय, अहिल्यानगर

भारतीय स्टेट बँक / State Bank of India — ताबा सूचना (अचल मालमत्ताकरिता)

क्षेत्रीय कार्यालय, अहमदनगर

तर, अधोस्वाक्षरी केलेले तर, अधोस्वाक्षरी केलेले 'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' (SARFAESI Act) अन्वये आणि 'सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रूल्स, २००२' च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, स्टेट बँक ऑफ इंडियाचे अधिकृत अधिकारी (खाली सही करणारे) यांनी कर्जदार श्री. इनामदार रफीक सुलतान आणि श्रीमती अस्मिना रफीक इनामदार यांना २१-०४-२०२६ रोजी मागणी नोटीस बजावली होती. या नोटिशीद्वारे त्यांना २१.०४.२०२६ रोजीची थकबाकी रक्कम रु. २५,५६,२५९/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख छप्पन्न हजार दोनशे एकोणसाठ फक्त) तसेच न लावलेले व्याज (unapplied interest) व इतर शुल्क आणि करारातील दराप्रमाणे व्याज, मागणी नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्यास सांगण्यात आले होते. कर्जदारांनी सदर रकमेची परतफेड न केल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचित करण्यात येते की, खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने उक्त कायद्याच्या कलम १३(४) आणि उक्त नियमांच्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ०२/०७/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये; आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार हा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या रु. २५,५६,२५९/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख छप्पन्न हजार दोनशे एकोणसाठ फक्त) इतक्या रकमेच्या (२१.०४.२०२६ रोजीची थकबाकी अधिक न लावलेले व्याज व इतर शुल्क) बोज्याखाली (charge) असेल.

अचल मालमत्तेचे वर्णन : निवासी इमारत -: रो हाऊस क्र. १, प्लॉट क्र. ७५/ए/बी/सी/डी२, सर्व्हे क्र. २४/२५/१/२५/२, क्षेत्रफळ ५४.४४ चौ. मीटर. तिरंगा चौक, वैष्णव नगर, केडगाव, अहमदनगर, महाराष्ट्र - ४१४००५. मालमत्तेच्या सीमा -: पूर्वेकडे : प्लॉट क्र. ६५; पश्चिमेकडे : ६ मीटर रस्ता; दक्षिणेकडे : प्लॉट क्र. ७५/A/B/C/D3 (रो-हाऊस क्र. २); उत्तरेकडे : प्लॉट क्र. ७५ A/B/C/D1.

दि. 02/07/2026 (मराठी भाषांतर, मुळ इंग्रजी मसुदा ग्राह्य)
ठिकाण : अहिल्यानगर

प्राधिकृत अधिकारी
स्टेट बँक ऑफ इंडिया,
क्षेत्रीय कार्यालय, अहिल्यानगर

SBI

नेटवर्क टेक्नोलॉजी विभाग, भारतीय स्टेट बँक, ग्लोबल आयटी- सेंटर
सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

निविदा आमंत्रित करणारी सूचना

आरएफपी क्र. SBI/GITC/Network Technology/२०२६-२७/१४७२ दिनांक: ०६.०७.२०२६

नेटवर्क परफॉर्मन्स मॉनिटरिंग आणि डायग्नोस्टिक (एनपीएमडी) सोल्यूशनच्या खरेदीसाठी भारतीय स्टेट बँक पात्र बोलीदारांकडून बोली मागवत आहे. अधिक तपशीलांसाठी, कृपया **https://sbi.bank.in** या ठिकाणी 'प्रोक्यूरमेंट न्यूज' येथे व ई- प्रोक्यूरमेंट एजन्सी पोर्टल **https://etender.sbi/SBI/** येथे भेट द्या. या आरएफपीशी संबंधित पुढील शुद्धीपत्रक/परिशिष्ट केवळ बँकेच्या वर नमूद केलेल्या वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.

आरएफपी डाऊनलोड करण्याची सुरुवात : दिनांक ०६.०७.२०२६ पासून

बोली सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ : दिनांक ३१.०७.२०२६ दुपारी ३.३० पर्यंत.

नेटवर्क टेक्नोलॉजी विभाग

दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे

(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. 471/472, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-411037.
फोन : (020) 24261755/24262745 /Toll Free No.: 1800 890 8474
ईमेल : vsbl@vishweshwar.bank.in संकेत स्थळ : http://vishweshwar.bank.in

55 वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
(केवळ सभासदांसाठी)

दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे या बँकेची 55 वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दि. 23 जुलै 2026 रोजी सायं. 5.00 वाजता 'गोल्डन लिफ लॉन्स', सर्व्हे नं. 46/1, बी-1ए, 100 फूटी डी. पी. रोड, म्हात्रे पुलाजवळ, शुभारंभ लॉन्स शेजारी, एरंडवणे, पुणे - 411 052 या ठिकाणी खालील विषयावर विचार करुन निर्णय घेण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय

1. दि. 27 जून 2025 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2. मा. संचालक मंडळाने तयार केलेला वर्ष 2025-26 चा वार्षिक अहवाल व दि. 31 मार्च 2026 अखेरचा ताळेबंद आणि वर्ष 2025-26 चे नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे व सभासदांकडून अहवालासंबंधी आलेल्या लेखी प्रश्न/सूचनांचा विचार करणे.
3. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वर्ष 2025-26 च्या नफा विभागणीची नोंद घेणे व मंजूरी देणे.
4. मा. वैधानिक लेखापरीक्षक M/s. S U N S V G & Associates यांच्याकडून प्राप्त झालेल्या वर्ष 2025-26 च्या वैधानिक लेखा परीक्षण अहवालाची व वर्ष 2024-25 च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती पूर्तता अहवालाची नोंद घेणे.
5. आर्थिक वर्ष 2026-27 साठी रिझर्व्ह बँकेच्या पूर्व मान्यतेने मा. वैधानिक लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.
6. आर्थिक वर्ष 2026-27 साठी मा. संचालक मंडळाने मा. स्थानिक लेखा परीक्षकांच्या केलेल्या नियुक्तीस व मेहनतान्यास मान्यता देणे व वर्ष 2027-28 साठी स्थानिक लेखा परीक्षकांची नियुक्ती करण्याचे व मेहनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.
7. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 कलम 39(3) नुसार, बँकेचे मा. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना वर्ष 2025-26 मध्ये दिलेल्या कर्जांची माहिती घेणे.
8. वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या बुडित कर्जाची येणे बाकी, कर्ज वसुलीचे सर्व अधिकार अबाधित ठेवून निर्लेखित (Write-Off) करण्यासाठी मान्यता देणे.
9. बँकेच्या दीर्घकालीन उद्दिष्टे व वार्षिक योजना आणि अंदाजपत्रकाची नोंद घेवून त्यास मान्यता देणे.
10. आपल्या बँकेत विलीनीकरण करु इच्छिणाऱ्या अन्य बँकांच्या प्रस्तावांवर विचार करुन निर्णय घेण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.
11. पोटनियमांमध्ये सुचविलेल्या दुरुस्त्यांना मान्यता देणे.
12. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 कलम 39 (1)(I) नुसार बँकेचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नात्यातील सेवकांच्या सूचीची नोंद घेणे.
13. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांच्या रजेस मान्यता देणे.
14. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन,

स्थळ : पुणे
दिनांक : 02 जुलै 2026

हेमंत व्हाडपांडे
मुख्य कार्यकारी अधिकारी

विशेष सूचना : 1) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास, सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी सायंकाळी 5.30 वाजता घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्या नसली तरी वरील विषयांचे कामकाज होईल. **2)** दि. 31 मार्च 2026 चा ताळेबंद व वर्ष 2025-26 चे नफा-तोटा पत्रक, पोटनियम दुरुस्ती तपशील बँकेच्या वेबसाईट **http://vishweshwar.bank.in** वर आणि दि. 25.06.2026 च्या दै. लोकसत्तामध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे. **3)** वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये निर्देशित केलेल्या विषयासंबंधीची आवश्यक ती कागदपत्रे, माहिती व दिनांक 27 जून 2026 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त पहावयाचे असल्यास ते बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये दिनांक 13 जुलै 2026 ते दिनांक 17 जुलै 2026 सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 या वेळेत (सुट्टीचे दिवस सोडून) पहावयास मिळेल. **4)** ज्या सभासदांना वार्षिक सर्व साधारण सभेच्या विषयपत्रिकेतील बाबीसंबंधी माहिती विचारावयाची असेल, त्यांनी दिनांक 17 जुलै 2026 पूर्वी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य कार्यालय यांचेकडे लेखीपत्र सादर करावे. **5)** सभासदांनी आपला लाभांश खात्यात जमा करण्यासाठी संबंधित शाखेत आपले खाते क्रमांक व आयएफएससी कोड कळवावा. तीन वर्षापेक्षा (सन 2022-23 वर्षाचा) अधिक काळ न घेतलेली लाभांशाची रक्कम ही बँकेच्या वैधानिक राखीव निधीत जमा करण्यात येते. **6)** ज्या सभासदांचा पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी बदलला असेल त्यांनी आपला नवीन पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी, मुख्य कार्यालयास त्वरीत कळवावा.

फॉर्म क्र.-३ [पहा नियमन-१३(१)(ए)]

ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

तळ मजला, 'जिवन सुमन', बिल्डींग, प्लॉट क्र.३, एन-५, सिडको, औरंगाबाद-४३१००३

दावा क्र. : **OA/३६२/२०२५** — नि.क्र. १२

ऋण वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियमावली, १९९३ चे नियम ५ चे उप-नियम २(A) सह वाचण्यात येणारे कायद्याचे कलम १९ चे उपकलम (४) अंतर्गत समन्स

बँक ऑफ महाराष्ट्र विरुद्ध **मे. एमडीएल अ‍ॅग्रो प्रॉडक्ट्स्**

प्रति,

१) **मे. एमडीएल अ‍ॅग्रो प्रॉडक्ट्स्,** मार्फत त्यांचे प्रोप्रायटर **स्नेहल रोहन लांडे,** गट क्र.१४५७/२/१, धोरा नदी जवळ, नेवासा रोड, मु.पो. जोहरापुर, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र-४१४५०२

समन्स

ज्या अर्थी **OA/३६२/२०२५** नामदार पिठासीन अधिकारी/निबंधक यांचे समोर **दि.२५/०५/२०२६** रोजी सूचीबद्ध केले होते.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रू.४,९८,७४,३१५.२/-** कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्या विरुद्ध दाखल केलेल्या कायद्याचे कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (OA) समन्स/सूचना जारी केली.

कायद्याचे कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(i) समन्स बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत कारणे दाखविण्यासाठी विनंती करण्यात आली ती का देण्यात येऊ नये,

(ii) मूळ अर्जाच्या अनु.क्र.३A अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मत्ताव्यतिरिक्त अन्य मालमत्ता आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे ;

(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबीत असल्याने मूळ अर्जाच्या अनु.क्र.३A अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींच्या तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला प्रतिबंधीत करण्यात आले आहे ;

(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंधी बनवले आहे त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु.क्रमांक ३A अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **दि. ३१/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **निबंधक यांचे समोर** हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

दि. ०५/०६/२०२६ रोजी माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने देण्यात आले.
(स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकारी यांची स्वाक्षरी
स्वाक्षरी/-
निबंधक
ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

SHREE

सिडको शहरांचे शिल्पकार

शुद्धिपत्रक क्र. ०१ (प्रथम मुदतवाढ)

नवी मुंबईच्या विविध नोडमध्ये तारांकित हॉटेल (थ्री स्टार व त्यावरील) वापराकरिता 07 भूखंड भाडेपट्ट्याने उपलब्ध

योजना क्र. : एमएम/५०/२०२६-२७

सिडको महामंडळातर्फे गुरुवार, दि. ११ जून २०२६ रोजीच्या दैनिक लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस, द न्यु इंडियन एक्सप्रेस आणि नवभारत मध्ये उपरोक्त शीर्षकांतर्गत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीकरिता मुदतवाढ देण्यात आली असून सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

सुधारित वेळापत्रक :

१) ई-निवेदेकरिता अर्ज सादर करणे, अनामत रकमेचा शुल्क भरणा व प्रक्रिया शुल्क भरणा इ. करीता सुधारित तारीख दि. ०६.०७.२०२६ ऐवजी **दि. २०.०७.२०२६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** अशी असणार आहे.

२) बंद निविदा सादर करण्याकरिता सुधारित तारीख दि. ०६.०७.२०२६ ऐवजी **दि. २०.०७.२०२६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** अशी असणार आहे.

३) ई-लिलावाकरिता अर्ज सादर करणे, अनामत रकमेचा शुल्क भरणा व प्रक्रिया शुल्क भरणा इ. करीता सुधारित तारीख दि. ०७.०७.२०२६ ऐवजी **दि. २१.०७.२०२६ रोजी १२.०० वाजेपर्यंत** अशी असणार आहे.

४) ई-लिलावाकरिता सुधारित तारीख दि. ०७.०७.२०२६ ऐवजी **दि. २१.०७.२०२६ रोजी ११.०० वाजेपासून ते १८.०० वाजेपर्यंत** अशी असणार आहे.

५) कागदपत्र पडताळणीकरिता सुधारित तारीख दि. ०८.०७.२०२६ ऐवजी **दि. २२.०७.२०२६** अशी असणार आहे.

६) निकाल घोषित करण्याची तारीख : यथावकाश कळविण्यात येईल.

पणन व्यवस्थापक
(वाणिज्यिक)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०८६(अ)/२०२६-२७

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर (मुख्यालय राहुरी)
सिंचन भवन, छ. संभाजीनगर रोड, अहिल्यानगर

Email ID - exengrmula@gmail.com — दुरध्वनी क्र. 0241- 2326086

जाहीर दरपत्रक प्रसिध्दी सूचना क्र. 01 सन 2026-2027 (प्रथम प्रसारण)

(Quotation Notice-Budgetary Offer)

कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर, मुख्यालय-राहुरी, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून सोबतचे यादीप्रमाणे बंद पाकीटात दरपत्रके मागवित आहेत. दरपत्रके स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

कामाचे वर्णन	ठेकेदाराचा नोंदणी वर्ग	दरपत्रक सादर करावयाचा कालावधी	दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण
मुळा धरणातील गाळ काढून त्याची साठवण क्षमता पूर्ववत करण्यासाठी सर्वेक्षण, गाळाचे विश्लेषण आणि वर्गीकरण करण्याच्या कामाचा तपशीलवार प्रकल्प अहवाल बनविणे.	निविदेतोल अटी व शर्तींची पूर्तता करणारे सक्षम कंत्राटदार	दिनांक 06/07/2026 रोजी सकाळी 9.45 ते 13/07/2026 सायंकाळी 18.15 वा. पर्यंत या कार्यालयीन वेळेत सादर करावे.	कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर, मुख्यालय-राहुरी यांचे कार्यालयात नमूद दिनांक व वेळेनुसार

Sr.	Description of Studies	Unit
1	**Hydrographic/Land/Lead Survey of Reservoir** **Carrying out comprehensive hydrographic/land lead surveys** of the reservoir area with marine survey vessels/boats, DGPS, Echo Sounder. Total Station, RTK-GPS, Lead Survey equipment and all other accessories required for including mobilization and demobilization of all equipment, marine crafts, fuel, transportation. boarding and lodging of staff, collection of field data, establishment of survey control points, processing and validation of survey data, preparation of bathymetric maps, contour plans, longitudinal and cross sections. computation of reservoir capacity, submission of draft and final survey reports, coloured survey charts in A0 size, GIS/CAD compatible soft copies and all other deliverables including all labour, materials, consumables, taxes, duties, incidental expenses etc complete as directed by the Engineer-in-Charge. **(Excluding GST)**	One Km
2	**Sub-Bottom Profiling and Sediment Thickness Assessment** **Carrying out Sub-Bottom Profiler Survey using DGPS** integrated Boomer/Pinger/Chirp System or equivalent technology having minimum penetration up to 20 metres or up to bed rock, whichever is encountered earlier, for determining sediment thickness, bed profile and preparation of sediment isopach maps throughout the reservoir area including survey planning, acquisition of field data, processing, interpretation, preparation of geophysical profiles, sediment thickness maps, isopach contours, identification of hard strata, submission of interpretative reports, coloured drawings in A0 size and GIS/CAD compatible digital dataincluding mobilization, demobilization, survey vessel, manpower, equipment, software, consumables, taxes, duties and all incidental expenses etc complete as directed by the Engineer-in-Charge. **(Excluding GST)**	One Km
3	**Topographic Survey of Reservoir Area** Conducting detailed topographic survey of exposed reservoir bed and adjoining land during lean season using DGPS/RTK-GPS /Drone/LiDAR (wherever required) and other modern survey equipment for preparation of Digital Terrain Model (DTM), contour maps, longitudinal and cross sections, ground levels and other topographic details required with establishment of benchmarks, data processing, preparation of contour maps, GIS/CAD compatible drawings, submission of reports and soft copies including all manpower, equipment, software, transportation, consumables, taxes, duties and incidental expenses etc complete complete as directed by the Engineer-in-Charge. **(Excluding GST)**	One Sq. Km
4	**Geotechnical Investigation and Laboratory Testing** **Conducting marine and land geotechnical investigations** including mobilization of suitable pontoons, drilling rigs, marine crafts and accessories for carrying out 150 mm diameter boreholes up to 10 metres below reservoir bed/ground level or as directed including Standard Penetration Tests (SPT) at 1 metre intervals or as per relevant IS Codes, collection of disturbed and undisturbed soil samples, use of casing pipes, bentonite circulation wherever required, bore logging, groundwater observations, transportation of samples, laboratory testing of soil and sediment samples, preparation of factual and interpretative geotechnical reports along with recommendations for desilting methodology and disposal strategy with all materials, consumables, labour, equipment, marine crafts, transportation, taxes, duties and incidental expenses etc complete as directed by the Engineer-in-Charge. **(Excluding GST)**	One No
5	**Preparation of Detailed Project Report (DPR) for Restoration of Reservoir Capacity through Desilting** Preparation of a comprehensive Detailed Project Report based on hydrographic survey, topographic survey, sub-bottom profiling, geotechnical investigations, laboratory testing and all relevant field investigations. The scope shall include estimation of sediment quantity and characteristics, reservoir capacity analysis, selection of suitable desilting methodology, dredging plan, sediment disposal/utilization plan. environmental and statutory compliance requirements, implementation strategy, cost estimates, economic and financial analysis, construction planning, risk assessment, drawings, GIS mapping, quantity estimates, specifications, BOQ, tender recommendations and all other technical documents required for execution of the project. The agency shall make presentations before the Department whenever required, incorporate observations of the Department, and submit the final DPR in required hard and editable soft copies along with all supporting data and drawings including all manpower, experts, software, field visits, report preparation, printing, presentations, revisions, taxes, duties and incidental expenses etc complete as directed by the Engineer-in-Charge. **(Excluding GST)**	L/S

वरील कामाची जाहीर दरपत्रक प्रसिध्दी सूचना कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे. (सदर जाहीर दरपत्रक प्रसिध्दी सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावण्यात येईल)

अटी व शर्ती:-
1) सदर दरपत्रक हे केवळ अंदाजपत्रक तयार करणेच्या हेतुने मागवित आहेत.
2) निविदा अथवा कामाच्या अनुषंगाने सदर दरपत्रक कोणत्याही प्रकारे आश्वस्त करीत नाही.
3) एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवला आहे.
4) दरपत्रकात सादर केलेले सर्व दरांचे दर विश्लेषण दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे. दरपत्रकासोबत दर पृथःकरण जोडलेले नसल्यास दरपत्रक नाकारण्यात येईल.

dgipr/2026-27/1489

स्वाक्षरी/- (सायली पाटील)
कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग,
अहिल्यानगर. मुख्यालय - राहुरी